# केळी

**१) केळी लागवडीसाठी कोणती जमीन योग्य असते ?**

- केळी लागवडीसाठी मध्यम ते भारी, भरपूर सेंद्रिय पदार्थ असणारी, पाण्याचा चांगला निचरा होणारी जमीन योग्य असते.जमिनीचा सामू ६.५ ते ८.० च्या दरम्यान असावा. क्षारयुक्त, चोपण व चुनखडीयुक्त जमिनीत केळीची लागवड करू नये.

२) **केळी लागवड कोणत्या हंगामात करावी** ?

- केळी लागवड मृग बाग (जून-जुलै) व कांदे बाग (ऑक्टोबर-नोव्हेंबर) मध्ये करावी.

**३) केळी लागवडीसाठी कोणते वाणाची निवड करावी ?**

- केळी लागवडीसाठी फुले प्राईड, ग्रॅड नैन व श्रीमंती या वाणांची निवड करावी.

**४) अधिक उत्पादनासाठी केळी लागवडीसाठी कोणत्या वाणाची निवड करावी ?**

- अधिक उत्पादनासाठी केळी लागवडीसाठी टिश्यू कल्चर पद्धतीने तयार केलेल्या ग्रॅड नैन या वाणांची निवड करावी.

**५) केळी लागवडीसाठी लागवड अंतर किती ठेवावे व एक एकर क्षेत्रामध्ये केळी लागवडीसाठी किती रोपांची गरज असते?**

- केळी लागवडीसाठी लागवड अंतर ५ x ५ फुट (१.५ x१.५ मीटर) ठेवावे. एक एकर क्षेत्रामध्ये केळी लागवडीसाठी १७४२ रोपांची गरज असते?

**६) केळी लागवडीसाठी रोपांची निवड व लागवड करताना कोणती काळजी घ्यावी?**

- केळी लागवडीसाठी कंद मुनवे निरोगी आणि जातिवंत बागेतूनच निवडावे. कंद ३ ते ४ महीने वयाचे, ४५० ते ७५० ग्रॅम वजनाचे आणि उभट किंवा नारळाच्या आकाराचे असावेत. कांदावर ३ ते ४ रिंगा ठेवून खालील बाजूने वरचेवर कंद तासून घ्यावा. कंद लागवडीपूर्वी १० लिटर पाण्यात कार्बेन्डाझिम १० ग्रॅम आणि मोनोक्रोटोफॉस १५ मिलि मिसळून द्रावण तयार करावे. या द्रावणात कंद किमान अर्धा तास बुडवून ठेवावेत. त्यानंतर कंदाची लागवड करावी.

**७) केळी बागेत कोणते आंतरपिके घ्यावीत ?**

- केळी बागेत हंगामनिहाय चवळी, उडीद, मूग व भुईमुग यांसारखी आंतरपिके घेता येतात. परंतु बागेत काकडी, भोपळा, कलिंगड, खरबूज, मिरची व वांगी यांसारखी पिके घेणे कटाक्षाने टाळावे.

**८) केळी बागेत काकडी, भोपळा, कलिंगड, खरबूज यासारखी वेलवर्गीय पिके व मिरची व वांगी यांसारखी पिके का घेऊ नयेत?**

- काकडी, भोपळा, कलिंगड, खरबूज यासारखी वेलवर्गीय पिके व मिरची व वांगी यांसारख्या पिकांवर सूत्रकृमीचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणावर होत असल्यामुळे या पिकांची काढनी झाल्यानंतर केळी बागेत सूत्रकृमीचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणावर होण्याची शक्यता असते. त्यामुळे ही आंतर पिके घेऊ नयेत.

**९) केळी बागेत खत व्यवस्थापन कशा पद्धतीने करावीत ?**

- केळी लागवडीच्या वेळी शेणखत - १० किलो / झाड, गांडूळ खत - ५ किलो / झाड तसेच अॅझोस्पिरीलम - २५ ग्रॅम / झाड व पी.एस.बी. - २५ ग्रॅम / झाड शेणखतात मिसळून द्यावीत. केळीसाठी प्रति झाडास २०० ग्रॅम नत्र, ६० ग्रॅम स्फुरद व २०० ग्रॅम पालाश देण्याची शिफारस करण्यात आलेली आहे.

**१०) केळी बागेत सुक्ष्मअन्नद्रव्ये कशा पद्धतीने वापरावीत?**

- केळी लागवडीनंतर दुसऱ्या व चौथ्या महिन्यात इडिटीए-जस्त आणि इडिटीए-लोह यांची प्रत्येकी ५० ग्रॅम १० लिटर पाण्यात घेवून फवारणी करावी. तसेच, पाचव्या व सातव्या महिन्यात जमिनीमधून झिंक सल्फेट आणि फेरस सल्फेट प्रत्येकी १५ ग्रॅम प्रति झाड शेणखतात (१५० ग्रॅम) मुरवून वापरावे.

**११) केळी घडाची गुणवत्ता वाढविण्यासाठी कोणकोणत्या उपाययोजना कराव्यात?**

- केळी घड पूर्ण निसल्यावर केळ फूल वेळीच कापावे.घडावर८ ते ९ फण्या ठेवून बाकी खालच्या फण्या धारदार विळ्याने सुरवातीलाच कापून टाकाव्यात.केळीचा घड पूर्ण निसल्यावर व केळफुल तोडल्यावर त्यावर १०लिटर पाण्यात ५०ग्रॅम पोटॅशियम डायहायड्रोजन फोस्फेट अधिक १०० ग्रॅम यूरिया अधिक १० मिलि स्टिकर मिसळून फवारणी करावी. किंवा केळफुल कापल्यावर एकदा व त्यानंतर ३० दिवसांनी दुसऱ्यांदा १०

लिटर पाण्यात २०० ग्रॅम सल्फेट ऑफ पोटाश मिसळून फवारणी करावी. तसेच घडावर ६% सच्छिद्रतेच्या पांढऱ्या पॉलिथीन पिशव्यांचे आवरण करावे.

**१२) थंडीच्या काळात कमी तापमानामध्ये केळी बागेचे सरक्षण कश्या पद्धतीने करावे?**

- बागेत रात्रीच्या वेळी पाणी पुरवठा करावा. पहाटे बागेत ओला पाला पाचोळा जाळून धूर करावा. झाडास पिक अवस्थेनुसार प्रती झाड २५०ते १००० ग्रॅम निंबोळी ढेप द्यावी. घडावर ६% सच्छिद्रतेच्या पांढऱ्या पॉलिथीन पिशव्यांचे आवरण करावे.

**१३) अति जास्त तापमानामध्ये केळी बागेचे सरक्षण कश्या पद्धतीने करावे?**

- बागेत शिफारशी प्रमाणे पाणी पुरवठा करावा. बागेत केळी पाने व अवशेष, गव्हाचा भुसा, उसाचे पाचट, सोयाबीन भुसा यांचा वापर करून सेंद्रिय आच्छादन करावे. बागेत चारही बाजूने सजीव कुंपण करावे.एप्रिल महिन्यापासून दर पंधरा दिवसांनी १०लिटर पाण्यात ८०० ग्रॅम केओलीन ह्या बाष्परोधकाची फवारणी करावी.

**१४) सच्छिद्र प्लास्टिक पिशव्यांचा (स्कर्टिंग बॅगचा) केळी बागेमध्ये कश्यासाठी उपयोग होतो?**

- केळफुल कापल्यानंतर केळीचे घड ०.५ मि.मी. जाडीच्या ७५ x १०० से.मी. आकाराच्या ६ टक्के सच्छिद्र प्लास्टिक पिशव्यांनी ( स्कर्टिंग बॅगनी) झाकावेत. यामुळे घडचे रस शोषक किडींपासून सरक्षण होते व केळी घडाची गुणवत्ता टिकून राहते व निर्यातक्षम उत्पन्न घेणे श्यक्य होते.

**१५) केळीमध्ये बनाना स्पेशल चा वापर कधी व कसा करावा?**

- केळी बागेमध्ये बनाना स्पेशल चा वापर लागवडीनंतर ५ महिन्यापासून प्रत्येक महिन्याला १० महिन्यापर्यंत करावा. त्यासाठी १५ लिटर पाण्यात ७५ ग्रॅम बनाना स्पेशल अधिक १ शांपुचा पाऊच व २ लिंबाचा रस एकत्र करून फवारणी करावी.

**१६) केळी जास्त दिवस टिकवण्यासाठी कोणत्या उपाययोजना कराव्यात?**

- बाजारातून केळी घरी आणल्यानंतर त्यांच्या देठावर प्लास्टिक किंवा कागद गुंडाळुन ठेवा. यामुळे केळी जास्त दिवस टिकतील.

- केळी ठेवण्यासाठी विशेष हँगर बाजारात उपलब्ध असतात, त्याचा वापर करून केळी त्यात ठेवल्यास लवकर खराब होणार नाहीत.
- 'व्हिटॅमिन सी'ची गोळी केळी टिकवून ठेवण्यास मदत करते. यासाठी 'व्हिटॅमिन सी'ची गोळी पाण्यात मिसळा आणि त्या पाण्यात केळी ठेवा. यामुळे केळी लवकर खराब होणार नाहीत.
- कधीही केळी फ्रिजमध्ये ठेऊ नये. केळ्यांना नेहमी सामान्य तापमानाला (रूम टेम्परेचर) ठेवावे.
- बेकिंग सोडादेखील केळी टिकवून ठेवण्यात मदत करतो. यासाठी बेकिंग सोडा पाण्यात मिसळा आणि या पाण्यात केळी ठेवा. नंतर थोड्या वेळाने केळी पाण्यातून बाहेर काढून सामान्य तापमानाला ठेवा. यामुळे केळी लवकर खराब होणार नाहीत.
- आंबट फळांमध्ये सायट्रिक एसिड असते. आंबट फळांच्या रसामध्ये केळी साठवल्यास, केळी लवकर खराब होणार नाहीत तसेच ती काळीदेखील पडत नाहीत.

**१७) केळी बागेतील प्रमुख किडी कोणत्या व त्यांचे नियंत्रण कसे करावे?**

- १. **सोंडेकिड-** शिफारशीप्रमाणे पिकांची फेरपालट करावी. कंद प्रक्रिया करावी. सापळा म्हणून खोडाचे १५ ते ३० सेमी लांबीचे उभे कप एकरी १० ते १५ या प्रमाणात बागेत ठेवावे.

  २. **फुलकिडे-** व्हर्टिसिलिअम लेक्यांनी या जैविक बुरशींनाशकाची ३० ग्रॅम प्रती १० लिटर पाण्यात घेऊन घडावर फवारणी करावी किंवा निंबोळी अर्क ५०० मिलि १० लिटर पाण्यात घेऊन फवारणी करावी.

  ३. **मावा-** बाग तनमुक्त ठेवावी. नियंत्रणासाठी डायमेथोएट ३० इ.सी. २० मिली अधिक निंबोळी तेल ५० मिली अधिक ५ मिली स्टिकर हे १० लिटर पाण्यात घेवून दर ४-६ दिवसांनी फवारणी करावी.

  ४. **सूत्रकृमी-** शिफारस केल्याप्रमाणे कंद प्रक्रिया करावी. लागवडीच्या वेळी निंबोळी पावडर ५०० ग्रॅम प्रति झाड | लागवडी वेळी व त्यानंतर तिसऱ्या व सहाव्या महिन्यात खोडा भोवती बांगडी पद्धतीने द्यावी. * केळी बागेत झेंडू हे आंतरपिक घ्यावे.

**१८) केळी बागेतील प्रमुख किडी कोणत्या व त्यांचे नियंत्रण कसे करावे?**

**१. करपा (सिगाटोका)-** रोगग्रस्त पानाचा भाग / पाने काढून जाळावीत. * झाडावर २५ ग्रॅम मॅन्कोझेब ७५% डब्ल्यू.पी. किंवा २५ ग्रॅम कॉपर ऑक्सिक्लोराईड अधिक १० मिली स्टीकर १० लीटर पाण्यात मिसळून फवारावे. यानंतर १० लीटर पाण्यात १०० मिली मिनरल ऑईल मिसळून फवारणी करावी. किंवा* रोगाची लक्षणे दिसताच पायरॅक्लोस्ट्रोबीन २०% डब्ल्यू. जी. १५ ग्रॅम प्रती १० लिटर पाणी या प्रमाणात फवारणी करावी.

**२. काळी बोंडी (सिगार एन्ड रॉट)-** प्रादुर्भावग्रस्त केळी काढून नष्ट करावीत. घडावर २५ ग्रॅम मॅन्कोझेब ७५% डब्ल्यू.पी. + चांगल्या प्रतीचे स्टीकरसह १० ली. पाण्यात मिसळून फवारावे.

**३. पर्णगुच्छ (बंची टॉप)** (इन्फेक्शियस क्लोरॉसिस)- रोगाचा प्रादुर्भाव दिसताच रोगग्रस्त झाड उपटुन नष्ट करावे. रोगाचा प्रसार मावा किडीमुळे होत असल्याने झाडांवर आंतरप्रवाही किटकनाशकाची फवारणी करावी. केळी पिकात किंवा बागेभोवती काकडी वर्गीय, वांगेवर्गीय पिके घेऊ नयेत. बाग व बागे भोवतालचा परिसर तणमुक्त ठेवावा.